**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. २ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव – विजय आण्णा खुळे, वय – ४१ वर्षे,
व्यवसाय – नोकरी पो.कॉ ब.नं. २३००, राहणार – शिर्डी,
तालुका – राहता, जिल्हा – अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. दिनांक २६.०७.२०२० रोजी मी पोलीस स्टेशन अकोले येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी मी, पोलीस हे. कॉ. टोपले, पो.कॉ. बडे व महिला पो. कॉ. घुले असे कार्यरत होतो. त्यावेळी पोलीस निरिक्षक जोंधळे साहेबांनी आम्हाला कॅबीनमध्ये बोलावले व त्यांनी सांगितले की, कोतुळ येथे आण्णाभाऊ साठेनगर येथे एक महिला चोरून देशी दारूची विक्री करत आहे, आत्ता गेले तर मिळून येईल. त्यानंतर मी पो.हे.कॉ. टोपले, पो.कॉ. बडे व महिला पो. कॉ. घुले असे खाजगी वाहनाने कोतुळ दुरक्षेत्र येथे गेलो. तेथे गेल्यानंतर पो.हे.कॉ. टोपले यांनी दोन पंचांना बोलावले. बातमीतील हकिगत त्यांना समजावून सांगितली.

२. त्यानंतर आम्ही पोलीस स्टाफ व पंच असे पायी कोतुळ दुरक्षेत्र येथून नमूद ठिकाणी गेलो. तेथे एक महिला चोरून देशी दारूची विक्री करताना दिसून आली. त्यानंतर महिला पो. कॉ. घुले यांनी तिस ताब्यात घेतले. तेव्हा तिला तिचे नाव विचारले असता तिने तिचे नाव कमल विजय खरात असे सांगितले. आम्ही १७:०० वाजता छापा टाकला होता. तिच्या ताब्यात ३२ बॉबी संत्रा देशी दारूच्या बाटल्या मिळून आल्या. पोलीस कॉन्टेबल टोपले यांनी पंचांसमक्ष त्याचा घटनास्थळ जप्ती पंचनामा केला. त्यापैकी एक बाटली रासायनिक विश्लेषणाकरीता वेगळी काढून पंचांच्या

सहीचे लेबल लावले. त्यानंतर आरोपी व मुद्देमाल घेवून पोलीस स्टेशनला आलो व सदर घटनेबाबत मी फिर्याद दिली.

३. आता मला अभिलेखावरील मी दिलेली फिर्याद व छापील प्रथम खबर अहवाल दाखवण्यात आला. तो तोच असून त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी २६ व २७** देण्यात येते. मी आरोपीस ओळखतो. ती आजरोजी न्यायालयात हजर नाही.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. टी. एस. फापाळे यांच्या मार्फत –**

४. हे म्हणणे खरे आहे की, मी निघण्यापुर्वी स्टेशन डायरीला नोंद केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आण्णाभाऊ साठेनगर हे कोतुळ येथे भरवस्तीमध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, आण्णाभाऊ साठेनगर चौकाला लागून समोर डांबरी रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या रस्त्याला वर्दळ असते.

५. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्या खाजगी वाहनाने गेलो होतो असे सांगितले आहे त्या वाहनाचा नोंदणी क्रमांक व त्या वाहनाच्या चालकाचे नाव फिर्यादीमध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही छापा टाकण्याकरीता गेलोच नव्हतो, त्यामुळे वाहनाचा नोंदणी क्रमांक व चालकाचे नाव मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा हा पोलीस स्टेशनमध्ये बसून तयार केला व तेथेच पंचांच्या सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस हेड कॉ. टोपले यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला व महिला पोलीस कॉ. घुले यांनी महिलेस ताब्यात घेतले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर महिला ही दारूची चोरून विक्री करत होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तिच्या

ताब्यामध्ये बॉबी संत्रा देशी दारूच्या ३५ बाटल्या मिळून आल्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, जप्त बाटल्या पैकी एक बाटली रासायनिक विश्लेषणाकरीता काढून ठेवली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून कोणताही छापा न टाकता खोटी फिर्याद नोंदवली व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.08.11 18:19:52 +0530

दिनांक ०८.०८.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.